*मध्यवर्ती परिसर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे राज्यस्तरीय जीन बँक उभारणे व बळकटीकरण करणेबाबत...*

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ
## राहुरी, जि. अहमदनगर

विद्यापीठ निर्णय जा.क्र. एमटीजी-३ (७०५)/७३७ /२०२० दि. २९ डिसेंबर, २०२०

<u>वाचा</u> - १. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय जा.क्र. मफुवि-१४१५/प्र.क्र.८२/८-अे, दि. २८ मार्च २०१६,

२. कार्यकारी परिषदेच्या ३१५ व्या बैठकीतील ठराव क्र. १०/३१५ (१४.१०.२०१६),

३. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या ९६ व्या बैठकीतील ठराव क्र. २०/९६/२०१८,

४. प्रभारी अधिकारी, औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्प, मफुकृवि, राहुरी यांनी सादर केलेला प्रस्ताव जा.क्र. एमएपी/एसएलजीबी/यूआर/१८८/२०२०, दि. २०/१०/२०२०.

## पार्श्वभूमी -

विविध प्रकारच्या पारंपारिक व देशी वाणांचे, जनुकीय संग्रहाचे महत्व लक्षात घेता उदा. कडधान्य, तृणधान्य, भाजीपाला, फळपिके, औषणी व सुगंधी वनस्पती इ. पिकांचे बियाणे / जीन जतन व संवर्धन करणेसाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे सन २०१३-१४ मध्ये जीन बँकेची स्थापना करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने, संवर्धन केलेल्या जनुकांचे उत्पादन, पौष्टीकता, पाण्याचा ताणसहन करणारे, आम्ल व क्षारयुक्त जमिनीत तग धरणा-या, रोग व किडींना प्रतिकारक्षम गुणधर्मांचा अभ्यास करणे गरजेचे असल्याने कृषि, पशुसवंर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांचेकडील संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये विद्यमान जीन बँकेचे बळकटीकरण करणेकरीता रु. १०.०० कोटी मंजूर करण्यात आलेले आहे.

## विद्यापीठ निर्णय -

औषधी व सुगंधी प्रकल्प, मध्यवर्ती परिसर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे राज्यस्तरीय जीन बँक उभारणे व बळकटीकरण करणेसाठी संदर्भ क्र. ०१ अन्वये रु. १०.०० कोटी रक्कमेस मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रस्तावास कार्यकारी परिषदेने व महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद यांनी अनुक्रमे संदर्भ क्र. २ व ३ अन्वये प्रदानीत केलेल्या मान्यतेप्रमाणे मा. कुलगुरु महोदय मध्यवर्ती परिसर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे राज्य स्तरीय जीन बँक उभारणे व बळकटीकरण करण्यास मान्यता प्रदान करीत आहे.

जीन बँकेचे उभारणी व बळकटीकरण करणेसाठी राज्य शासनाकडून निश्चित केलेल्या अटी, शर्तीचे व वेळोवेळी दिल्या जाणा-या निर्देशांचे काटेकोर पालन करण्यात यावे. निधी उपलब्धतेचा तपशील ***परिशिष्ठ - अ*** मध्ये व कंत्राटी मनुष्यबळाचा तपशील ***परिशिष्ठ - ब*** मध्ये दर्शविण्यात आला आहे.

सदर जीन बँकेसाठी गहू विशेषज्ञ, कृषि संशोधन केंद्र, निफाड हे मुख्य संशोधक तर प्रभारी अधिकारी, औषधी व सुगंधी वनस्पती, मफुकृवि, राहुरी हे सह-संशोधक म्हणुन काम पाहतील. प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, मफुकृवि,

राहुरी यांच्याकडे या जीन बँकेचे प्रशासकीय व तांत्रिक नियंत्रण राहील व ते आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन काम पाहतील. तसेच संपूर्ण नियंत्रण संचालक संशोधन, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्याकडे असेल.

विहीत सर्व निकषांन्वये अंमलबजावणीचे तटस्थ वार्षिक मुल्यमापन संचालक (संशोधन) यांचे स्तरावरुन करण्यात यावे व तसा मुल्यमापन तथा फलनिष्पत्तीचा वार्षिक अहवाल मा. कुलगुरु महोदय यांना दरवर्षी सादर व्हावा.

सदरचा विद्यापीठ निर्णय नियंत्रक, म.फु.कृ.वि., राहुरी यांचे अनौपचारीक संदर्भ क्र. ९३५-व्हीसी, दि. २४/१२/२०२० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

**सही/-**
**(मोहन वाघ)**
**कुलसचिव**

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव-**

१. सचिव, महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मादाम काम रोड, हुतात्मा राजगुरु चौक, नरीमन पॉईट, मुंबई ४०० ०३२,
२. संचालक (संशोधन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे ४११ ००७,
३. संचालक, विस्तार शिक्षण / संशोधन / शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
४. अधिष्ठाता (कृषि), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
५. सहयोगी अधिष्ठाता (सर्व),
६. विभाग प्रमुख (सर्व),
७. सहयोगी संशोधन संचालक (सर्व),
८. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय (सर्व),
९. प्रभारी, कृषि संशोधन केंद्र / प्रकल्प (सर्व),
१०. विद्यापीठ ग्रंथपाल / नियोजन अधिकारी, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
११. नियंत्रक / विद्यापीठ अभियंता, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
१२. उप कुलसचिव (प्रशासन) / (विद्या), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
१३. अधिदान व लेखाधिकारी, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
१४. मा. कुलगुरु / कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.

ASPadvi

**(आशा पाडवी)**
**उप-कुलसचिव (प्रशासन)**

*परिशिष्ठ - अ*

*राज्यस्तरीय जीन बँक, मध्यवर्ती परिसर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी*

*निधी उपलब्धतेचा तपशील (२०१६-१७ ते २०२१-२२)*

| अ.क्र. | कामाचा तपशील | अंदाजे किंमत रु. लाख |
|---|---|---|
| | **(अ) बांधकाम** | |
| १. | जनुक बँकेचे बांधकाम | २२०.०० |
| २. | शितगृह (दोन) | १३२.०० |
| ३. | कार्यालय | ३०.०० |
| ४. | भांडार खोली | २५.०० |
| ५. | वाळवणीगृह (Drying shade) | ४०.०० |
| ६. | मळणी यार्ड | २०.०० |
| ७. | जनरेटर शेड | ०.५० |
| ८. | कंपाऊंड (Fencing) | १५.०० |
| ९. | पाणी सुविधा | १०.०० |
| १०. | इतर सुविधा (Glass house, green house & Polyhouse etc.) | २०.०० |
| | **एकूण (अ)** | **५१२.५०** |
| | **(ब) प्रयोगशाळा साहित्य (Non-recurring)** | |
| १. | स्मॉल पोर्टेबल एलीमीटर (For measuring plant height) | ०.२५ |
| २. | पॉकेट मार्किंग कंपास | ०.१५ |
| ३. | दुर्बीण (मोठी) | ०.२५ |
| ४. | टेप रेकॉर्डर (बॅटरीवर चालणारे) | ०.२५ |
| ५. | लीप मायक्रोस्कोप | ०.२० |
| ६. | डायल रिडींगहेअर हायड्रोमीटर | ०.१५ |
| ७. | तापमान मोजमापक (Soil Thermometers) | ०.१० |
| ८. | हॅन्ड लेंसेस | ०.२५ |
| ९. | कॅमेरा (२ नग), टेलीफोटो (१०० एमएम), लेंसेस, युव्ही फिल्टर्स, हुडकप इ. | ५.०० |
| १०. | संगणक, युपीएस, स्कॅनर्स इ. | २.०० |
| ११. | डीप फ्रिज (-२० ते -४० अंश सेल्सीअस) | २.०० |
| १२. | झेरॉक्स मशीन व कलर प्रिंटर | २.५० |
| १३. | सिड जर्मीनेटर (Seed germinator) | १०.०० |
| १४. | एच.पी.एल.सी. (HPLC Preparatory) | ३३.७५ |
| १५. | कार्यालयीन फर्निचर्स, कपाटे, रॅक्स इ. | १०.०० |
| १६. | इलेक्ट्रीक साहित्य, फॅन, एअर कंडिशन फिटींग | १५.०० |
| १७. | घडीचा चाकु (Folding pocket knives) | ०.१० |
| १८. | सिकेटर | ०.०५ |
| | **एकूण (ब)** | **८२.००** |
| | (क) कंत्राटी कर्मचारी, कार्यालयीन आवर्ती व अनावर्ती खर्चाचा ५ वर्षाच्या खर्चाचा तपशील (सन २०१६-१७ ते २०२१-२२) | **३३३.५०** |
| | (ड) आवर्ती खर्च - उपभोग्य भांडार, वीजबील, इंधनखर्च, वाहनांचा भाडे खर्च, छपाई खर्च इ. | **५२.००** |
| | (इ) अनावर्ती खर्च - उपकरणे / अवजारे, किरकोळ दुरुस्ती आणि कार्यालयीन खर्च इ. | **२०.००** |
| | **एकूण (अ) + (ब) + (क) + (ड) + (इ)** | **१०००.००** |

### *परिशिष्ठ - ब*

### *राज्यस्तरीय जीन बँक, मध्यवर्ती परिसर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी*

### *कंत्राटी मनुष्यबळाचा तपशील (२०१६-१७ ते २०२१-२२)*

*(रु. लाख)*

| *अ.क्र.* | *पदाचे नाव* | *एकुण पदांची संख्या* | *अंदाजे प्रती वर्ष खर्च* | *एकुण खर्च* |
|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ संशोधन सहाय्यक (Senior Research Fellow) | ४ | २७.२० | १३६.०० |
| २ | कनिष्ठ संशोधन सहाय्यक (Junior Research Fellow) | ४ | २२.०० | ११०.०० |
| ३ | संगणक चालक | १ | १.४० | ७.०० |
| ४ | कुशल मदतनीस | ४ | ४.३० | २१.५० |
| ५ | अकुशल मजुर | १० | ८.०० | ४०.०० |
| ६ | सुरक्षा रक्षक / पहारेकरी | ३ | ३.८० | १९.०० |
| ***एकूण*** | | | | ***३३३.५०*** |

(आशा पाडवी)
उप-कुलसचिव (प्रशासन)